## <u>नियमित दिवाणी मुकदमा नं.२८६/२०१२ – निशाणी ७६ लगत आदेश</u>

मौला उर्फ मोहन विठ्ठल होवाळ इ. वि. ज्ञानेश्वर आनंदा वाघमारे इ.

CNR NO. MHSO20–000972–2012

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांना प्रतिवादी क्र.२ यांचा उलटतपास घेण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ चे अर्जातील कथन असे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.२ यांनी सदर दावा मान्य व कबुल करुन सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दिलेले आहे. सदर प्रतिवादी क्र.२ यांनी सदरचा पुरावा प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द दिलेला असून वादी व प्रतिवादी क्र.२ हे एकमेकास कोलुजीव आहेत. त्यामुळे सदर प्रतिवादी क्र.२ यांचा प्रतिवादी क्र.१ यास उलटतपास घेणे अत्यंत जरुरीचे आहे. तसे न झाल्यास प्रतिवादी क्र.१ चे फार मोठे नुकसान होणार आहे. सबब प्रतिवादी क्र.१ यास प्रतिवादी क्र.२ यांचा उलटतपास घेण्यास परवानगी मिळण्याची व अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. सदरील अर्जास प्रतिवादी क्र.२ तर्फे म्हणणे मांडले की, प्रतिवादी क्र.१ चा अर्ज व त्यामधील मजकूर कायदेशीर व खरा नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. दोन्ही पक्षकारांतर्फे युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादीने हद्दीखुणा ठरवुन निरंतर ताकीदीचा वैकल्पीकरित्या अतिक्रमीत जमिनीच्या कब्जाबद्दलचा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२ हा प्रतिवादी क्र.१ चा मुलगा आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ चा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी नि.७५ वर सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.१ चे असे कथन आहे की, सदर सरतपासाच्या शपथपत्रातील मजकूर प्रतिवादी क्र.१ च्या विरुध्द आहे. सबब, सत्यपरिस्थीतीचा विचार करता प्रतिवादी क्र.१ यांना प्रतिवादी क्र.२ चा उलटतपास घेण्याची परवानगी देणे उचित होईल त्यामुळे वादी अथवा प्रतिवादी क्र.२ चे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो.

### <u>आ दे श</u>

१. अर्ज (नि.क्र.७६) मंजूर करणेत येतो.

२.  प्रतिवादी क्र.१ याला प्रतिवादी क्र.२ यांचा उलटतपास घेण्याची मुभा राहील.

३.  खर्चाबाबत आदेश नाही.

PRACHI RAVINDRA KULKARNI

Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2025.10.10 13:39:26 +0530

दिनांक – ०९/१०/२०२५

(श्रीमती पी. आर. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Civil Judge, J.D. & J.M.F.C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 09/10/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 10/10/2025 |